## (४) भूपाळी

उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां ।
झाला अरूणोदय सरली निद्रेची वेळा ॥ १ ॥
संत साधू मुनी अवघे झालेती गोळा ।
सोडा शेजे सुखे आतां बघुं द्या मुखकमळा ॥ २ ॥
रंगमंडपी महाद्वारीं झालीसे दाटी ।
मन उतावीळ रूप पहावया दृष्टी ॥ ३ ॥
राही रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया ।
शेजे हालवूनी जागें करा देवराया ॥ ४ ॥
गरूड हनुमंत उभे पाहती वाट ।
स्वर्गींचे सुरवर घेऊनि आले बोभाट ॥ ५ ॥
झाले मुक्तद्वार लाभ झाला रोकडा ।
विष्णुदास नामा उभा घेऊनि कांकडा ॥ ६ ॥